

रेखाटन : वसंत सरवटे

# दूरदर्शनवर महाभारत

- जयंत नारळीकर

दूरदर्शनवर महाभारताची मालिका पुष्कळ गाजली. ही हकीगत त्या मालिकेची नसून मूळ खऱ्याखुऱ्या महाभारताची आहे... 'कौरव-पांडव संगर तांडव द्वापरकाळी होय जसे' त्या महाभारताची. त्याकाळी दूरचित्रवाणी आणि वृत्तपत्रांसारखी प्रसारमाध्यमे असती तर? तर व्यासांच्या अठरा पुराणांत नसलेली माहिती उजेडात आली असती. पण ही जर-तरची भाषा कशाला करा? त्याकाळी सर्व आधुनिक तंत्रज्ञान होते, असे ठामपणे सांगणारी मंडळी आहेत. तेव्हा खालील निवडक घटना खरोखर घडल्या नसतील कशावरून?

× × ×

द्वापरकाळी धृतराष्ट्र महाराजांच्या राजवटीत राष्ट्रीय दूरचित्रवाणीचे जाळे आसेतु-हिमाचल आणि गांधारपासून मलय राज्यापर्यंत पसरले होते. त्याला 'दूरदर्शन' म्हणत. दूरदर्शनच्या तशा अनेक वाहिन्या होत्या; पण त्यांतली पहिली वाहिनीच राष्ट्रव्यापी होती. दुसरी 'राजधानी वाहिनी' काही निवडक राजधान्यांतच दिसे. त्यांत हस्तिनापुराखेरीज अंग आणि गांधार येथील राजधान्या होत्या आणि युद्धापूर्वी मद्रराज्यातील राजधानीचा समावेश करण्यात आला. इतर वाहिन्यांकरता सर्वसामान्यांना न परवडणारी उपग्रह यंत्रणा होती.

दुसरी वाहिनी कुठे दाखवायची हे ठरवण्यामागे राजकीय स्वार्थ आहे, असा आरोप पांडवांनी केला होता. गांधार नरेश शकुनी आणि अंगराज कर्ण हे दुर्योधन महाराजांच्या खास वर्तुळातले; म्हणून त्यांची राज्ये निवडली असा त्यांचा दावा होता. तो फेटाळून लावताना हस्तिनापूर येथील सूचना आणि प्रसारण मंत्रालयातला प्रवक्ता म्हणाला, ''गांधार हे सीमावर्ती राज्य म्हणून निवडण्यात आले; तर निम्नवर्णीयांना खास सवलत म्हणून अंगराजांचे राज्य निवडले. इथे राजकीय अथवा इतर कसल्या हितसंबंधांचा प्रश्नच उद्भवत नाही.''

× × ×

दूरदर्शनवर कशाचे, कोणाचे, कशा तऱ्हेने प्रसारण व्हावे याचे दण्डक होते. रोजच्या बातमीपत्रांत धृतराष्ट्र महाराज एकदा, दुर्योधन महाराज तीनदा आणि कर्ण - दुःशासन - शकुनी यांच्यापैकी एक तरी दाखवले जावेत, असा अलिखित (म्हणजे तोंडी कळवलेला) संकेत होता. प्रथम प्रथम हे एकतर्फी चित्रीकरण जनतेला फार जाणवे आणि दूरदर्शनला स्वायत्तता द्यावी अशी ओरड पांडव नेहमी करत.

पण आता जनतेला पर्वा नव्हती; कारण महाभारत युद्धापूर्वी दोन वर्षे भारतवर्षांत खासगी वाहिन्यांचा सुळसुळाट झाला होता. उपग्रहामार्फत इंद्रवाहिनी, गंधर्ववाहिनी, यक्षवाहिनी.... ज्यांना परवडेल त्यांना पाहता येई. त्यामुळे दूरदर्शनला पर्याय उपलब्ध झाले.

मात्र एक नवी डोकेदुखी सामान्य जनतेपुढे निर्माण झाली. मुले घटिका - प्रहर ह्या वाहिन्यांवरचे कार्यक्रम पहात बसत. इंद्रवाहिनीवर 'अमरावती' किंवा 'अलकापुरी' अशा मालिकांत अप्सरा - देव - गंधर्वादिकांचे चाळे, गंधर्व वाहिनीवरचे वेडेवाकडे संगीत; तर यक्षवाहिनीवर दाखवल्या जाणाऱ्या चित्रपटांतील हिंसाचार मुलांना वाईट वळण लावताहेत, अशा तक्रारी ऐकू येऊ लागल्या.

सूज्ञ लोक म्हणत, ''ही कलियुगाची नांदी आहे.''

### (अ) इति दूरदर्शन



**''हा मामला कौरव-पांडवांनी परस्पर वाटाघाटींनी सोडवायचा आहे. इतर त्रयस्थांनी त्यात हस्तक्षेप करू नये, असे दुर्योधन महाराजांनी स्पष्ट शब्दांत सांगितल्यामुळे...''**

देवर्षि नारदांनी सुरू केलेली नारदवाहिनी मात्र अशा तक्रारींपासून दूर होती. दर घटिकेला शक्य तितक्या वास्तववादी बातम्या पुरविणे आणि सद्यःस्थितीवर माहितीपट आणि चर्चासत्रे प्रक्षेपित करणे हा तिचा उद्देश. तिचे वार्ताहर नारदमुनीप्रमाणे त्रैलोक्यात फिरून बातम्या आणीत. युद्धाच्या रोमहर्षक बातम्या, कुठल्या योद्ध्याने कुठे तप करून कोणती नवी अस्त्रे मिळवली, कुठल्या राजाने कोणाच्या कन्येचे हरण केले, कुठल्या ऋषींचा कुठल्या अप्सरेने तपोभंग केला, कुबेराच्या खजिन्यात किती भर किंवा घट झाली वगैरे बातम्या शक्य तितक्या बिनचूकपणे पुरवण्यात नारदवाहिनीचा हातखंडा होता.

श्रीकृष्णाने विदुराकडे भाकरी खाल्ली ही बातमी दूरदर्शनने सांगितली नाही. पण नारदवाहिनीने तिला महत्त्व दिले आणि भाकरी भोजनामागच्या राजकारणाची चर्चा केली. त्यामुळे दुर्योधन महाराज त्रस्त झाले आणि त्यांच्या रागाचे पर्यवसान दूरदर्शनवरील वृत्तसंपादकाला निलंबित करण्यात झाले.

× × ×

पांडवांनी जाहीर केले, ''आम्ही केवळ पाच गावांवर समाधान मानू. ती दिलीत तर उर्वरित भरतखंडावर हक्क सांगणार नाही.'' ही मागणी रास्त आणि सौम्य आहे, ती मान्य केल्यास मोठे युद्ध टळेल, असे राजनीतीचे भाष्यकार सांगू लागले. त्यावर दुर्योधन महाराजांचे खास सल्लागार म्हणाले, ''ह्या दबावाला बळी पडता कामा नये. राष्ट्राची अखंडता टिकली पाहिजे.''

अखेर शिष्टाई करायला खुद्द श्रीकृष्ण धृतराष्ट्राच्या दरबारात दाखल झाले. त्या घटनेची ही दोन वेगवेगळी वर्णने पहा : -

दूरदर्शन : 'हा मामला कौरव - पांडवांनी परस्पर वाटाघाटीने सोडवायचा आहे. त्यात यादवांनी किंवा इतर त्रयस्थांनी हस्तक्षेप करू नये,' असे दुर्योधन महाराजांनी स्पष्ट शब्दात सांगितल्यामुळे श्रीकृष्ण यांना मोकळ्या हस्तांनी परतावे लागले.

नारदवाहिनी : श्रीकृष्ण पांडवांचे दूत म्हणून आले, तरी कौरव दरबारात त्यांना धमकावण्याचे प्रयत्न झाले. दूताला योग्य अशी वागणूक दिली जात नाही, अशी तक्रार नोंदवून श्रीकृष्णांनी विराट रूप धारण करून कौरवांना घाबरवून सोडले. अखेर चर्चेस सुरुवात झाली. परंतु दिवसाअखेर वाटाघाटी फिसकटल्या. याचे कारण दुर्योधन महाराजांचे प्रक्षोभक विधान ''युद्ध झाले तरी चालेल; पण मी सुईच्या टोकावर बसेल इतकी जमीनसुद्धा देणार नाही.''

ह्या विधानामुळे पुष्कळ खळबळ माजली. प्रमुख कौरवांनी नारदवाहिनीवर उगीच भडक बातम्या दिल्याचा आरोप केला आणि स्वतः दुर्योधन महाराजांनी आपण असे विधान केल्याचे नाकारले.

त्यावर नारदवाहिनीचा वार्ताहर म्हणाला : ''ते बोलणे ध्वनिमुद्रित केले गेले. त्याची ध्वनिफित माझ्याकडे आहे. मी ती लावून माझी बातमी खरी होती, हे सिद्ध करेन.'' आणि जाहीर पत्रकार परिषदेत त्याने ती लावून दाखवली.

त्यावर कौरवांचे प्रवक्ते जयद्रथ म्हणाले, ''ही ध्वनिफीत बनावट आहे. आणि तिच्यावर आम्ही भाष्य करू इच्छित नाही.''

× × ×

अखेर युद्ध होणार हे निश्चित झाले. पण ते धर्मयुद्धाच्या नियमांनुसार व्हावे, अशी सर्वांची इच्छा होती. ते नियम स्पष्ट करायला आणि युद्धात आचारसंहिता पाळली जाते हे पहायला धृतराष्ट्र महाराजांनी 'युद्ध-आयुक्त' हे पद निर्माण केले. हे पद भूषवायला धृतराष्ट्रांच्या विनंतीवरून भगवान विष्णू यांनी शेषनाग यांना अभिनियुक्तीवर हस्तिनापुरास पाठवले.

शेषनाग यांनी कडक नियम केले आणि आचारसंहिता काटेकोरपणे पाळली जावी, असा फतवा काढला. युद्धात लढणाऱ्या प्रत्येक योद्ध्याचे, प्राण्याचे (हत्ती-घोड्यांचे) सचित्र परिचयपत्र आवश्यक आहे, असा त्यांनी आदेश काढला. प्रत्येक राज्यात छायाचित्रासह परिचयपत्रे काढण्याची मोहीम धडाक्याने सुरू झाली.... कारण सर्व परिचयपत्रे तयार झाल्याशिवाय युद्ध सुरू करायला परवानगी मिळणार नाही, असे शेषनाग यांनी सांगितले.

पण हा नियम पाळला गेला नाही. एकदा युद्धारंभाची तारीख पुढे ढकलूनही अखेर मगधराज्याने परिचयपत्रे देण्यास असमर्थता व्यक्त केली. इतर राज्यांनी देखील सत्तर-ऐंशी टक्क्यांपुढे मजल मारली नव्हती. अखेर कौरव - पांडव दोन्ही बाजूंनी धृतराष्ट्र महाराजांवर दबाव आणून शेषनाग यांना हा नियम मागे घ्यायला लावला.

याची मोठी किंमत कौरवांना मोजावी लागली..... पण ती हकीगत पुढे योग्य वेळी येईलच.

× × ×

शेषनाग यांच्या नियमानुसार युद्धारंभाच्या एक दिवस आधी सर्व प्रचार थांबवायचा होता. तोपर्यंत कौरव आणि पांडव दोघांनी सर्व राज्यात प्रचार करून आपापली सैन्ये जमवली. आकडेवारी पाहता कौरवांचे अकरा; तर पांडवांचे सात अक्षौहिणी सैन्य

### (आ) इति नारदवाहिनी



**''प्रथमपासूनच स्फोटक असलेल्या सभेतील वातावरणात दुर्योधन महाराजांच्या प्रक्षोभक विधानानं ठिणगी पडली...''**

जमले...... कारण कौरवांची प्रचारयंत्रणा पांडवांपेक्षा अधिक सरस होती. याची दोन उदाहरणे पहा : एक यादवांचे तर दुसरे मद्रराज शल्य यांचे ह्या दोन्ही राज्यांत पांडवांचे पारडे जड असूनही त्यांची सैन्ये कौरवांना सामील झाली. प्रथम यादवांचे उदाहरण पाहू.

सकाळच्या बातमीपत्रात दूरदर्शनने पहिल्या मुख्य समाचारात सांगितले : ''संपूर्ण यादव जमातीने श्रीकृष्णांचा आदेश डावलून कौरवांना सामील व्हायचा निर्णय घेतला. भोज, अंधक, गद, बभ्रु इत्यादी यादववीरांचे दुर्योधन महाराजांनी सहर्ष स्वागत केले. आम्ही श्रीकृष्णांचा आदर करीत असलो, तरी कौरवांचीच बाजू न्यायाची असल्याने हा निर्णय घेतला, असे यादव प्रवक्ते कृतवर्मा म्हणाले. ह्या धक्क्याने श्रीकृष्ण विचलित झाले असून त्यांनी सक्रिय युद्धातून संन्यास घेतला आहे आणि केवळ अर्जुन यांच्या विनंतीवरून त्यांचे सारथी म्हणून ते काम पाहतील.

**(इ) इति शासकीय प्रवक्ता**



**''आम्ही भाष्य करू इच्छित नाही.''**

'इन्द्रप्रस्थ जलदवार्ता' ह्या कौरवविरोधी वृत्तपत्राने मात्र वेगळीच बातमी दिली. ''शासकीय बडगा दाखवून युद्धाच्या मोहिमेच्या खर्चासाठी कौरवांनी सावकारश्रेष्ठींकडून पुष्कळ धन वसूल केल्याचे सर्वज्ञात आहे. ह्या फतव्याचा विरोध करणाऱ्या वणिकांच्या घरी करवसुली अधिकाऱ्यांचे छापे पडत आहेत. ह्या धनाचा वापर कसा होतो? आमच्याकडे आजच सबळ पुरावा हाती आला आहे की, प्रत्येक यादव सामन्ताला लक्ष सुवर्णमुद्रांची थैली देण्यात आली.''

ही बातमी वाचून पांडवांनी शेषनाग यांच्याकडे याचिका दाखल केली की इथे युद्धाच्या आचारसंहितेचा भंग होत आहे आणि यादवांना युद्धात भाग घेण्यास बंदी घालावी.

ह्या प्रकरणावरून धृतराष्ट्र महाराजांच्या राजसभेत प्रचंड गदारोळ माजला. पांडवसमर्थकांनी सिंहासनाभोवती गर्दी करून राजदण्ड हिसकावून फेकून दिला; तर काहींनी कार्यसूचीपत्रे फाडून टाकली. अखेर महाराजांनी यादव प्रकरणाच्या चवकशीचे आश्वासन दिले आणि राजसभा तहकूब केली.

परंतु प्रत्यक्ष चवकशीत आचारसंहिता भंग झाल्याचा कुठलाही पुरावा सापडला नाही.

× × ×

पांडवांचे मामा मद्रराज शल्य आपल्या सैन्यासकट कौरवांना सामील झाल्याची बातमी नुकतीच आमच्या हाती आली आहे,'' दूरदर्शनने सायंकालीन बातमीपत्रात सांगितले. ''ह्या घटनेने कौरवांचे मनोधैर्य पुष्कळ उंचावले आहे; तर पांडवांच्या गोटात अपेक्षाभंगाचे वातावरण पसरले आहे. यादवांनंतर ह्या पक्षान्तरामुळे 'मित्र आणि नातलग यांच्याबद्दलही खात्री देता येत नाही,' असे उद्‌गार युधिष्ठिर महाराजांनी काढले.''


अंदर की बात दुसऱ्या दिवशी सकाळी नारदवाहिनीवर जाहीर झाली. ''मद्रराज आपले सैन्य घेऊन पांडवांच्या गोटाकडे चालले असता वाटेत त्यांना गाठून दुर्योधन महाराजांच्या वतीने त्यांचे पंचतारांकित स्वागत करण्यात आले. पाच ताऱ्यांच्या स्तरावरील म्हणजे सर्वोच्च स्वागताने मद्रराज भारावून गेले. त्यांतून दुर्योधन महाराजांनी दूरदर्शनच्या दुसऱ्या वाहिनीचे प्रक्षेपण मद्रराजधानीत ताबडतोब सुरू करण्याच्या सूचना दिल्याचे जाहीर केले. ह्या स्वागतभेटीचे प्रत्युत्तर म्हणून शल्यराजांनी आपला पक्ष बदलला.....''

ही बातमी ऐकून युधिष्ठिर महाराजांनी शेषनागांकडे तक्रार नोंदवली. युद्धापूर्वी अशा सोयी जाहीर करणे म्हणजे धर्मयुद्ध आचारसंहितेचा भंग होत नाही का? ह्या त्यांच्या प्रश्नावरून आयुक्तांनी कौरवांना 'कारणे दाखवा' म्हणून आदेश धाडला. त्यावर कौरवांनी खालील खुलासा प्रसिद्ध केला : -

''भरतखंडाच्या उत्तरेत आर्यावर्तातच दुसरी वाहिनी दाखवली जाते, ही दाक्षिणात्यांची तक्रार अनेक वर्षे होती आणि ती रास्त असल्याने दुसऱ्या वाहिनीचे प्रक्षेपण दक्षिणेत सुरू करायचा निर्णय आधीच घेतला होता. फक्त प्रक्षेपण यंत्रे गंधर्वलोकातून आयात करायची होती. ती गेल्या पक्षात आली. म्हणून हा निर्णय कार्यान्वित करता आला. त्याच सुमारास मद्रराज ह्या भागात आले असल्याने त्यांना ही माहिती प्रत्यक्ष देण्यात आली. दक्षिण भारतात असंतोषास जागा राहू नये आणि देशाची अखंडता अबाधित रहावी, ह्यापलीकडे दुसरा कुठलाही हेतू ह्या कृतीमागे नव्हता.''

ह्यासाठी पुरावा म्हणून कौरवांनी भूर्जपत्रांचे ढीग शेषनाग यांना

**अभिनियुक्तीनंतरची शेषनागांची पहिलीच प्रतिक्रिया**



**''मी जिथं अख्ख्या बकासुराची हाडं कच्ची खाऊ शकतो तिथं कोण कौरव न् कोण पांडव ?''**

सादर केले. त्यावरील नोंदींची छाननी करून निर्णय द्यायला शेषनाग यांनी धर्मयुद्ध कचेरीतल्या ज्येष्ठ अधिकाऱ्यांना सांगितले. पण ही छाननी युद्ध संपले, तरी चालूच होती......

× × ×

युद्धाची तिथी जवळ आली तशी इंद्र, गंधर्व आणि यक्षवाहिन्यांनी दूरचित्रवाणीवर युद्धाचे थेट प्रक्षेपण करायला परवानगी द्यावी याकरिता सूचना आणि प्रसारण मंत्रालयाकडे अर्ज केले. प्रत्येक वाहिनीने विपुल मानधन देऊ केले आणि आपण पूर्वी कुठल्या कुठल्या युद्धांचे थेट प्रक्षेपण दाखवले होते, त्यांच्या याद्या तयार केल्या. अर्थात् हे प्रक्षेपण पहायला अख्ख्या भरतखंडीच नव्हे, तर स्वर्ग-गंधर्व-यक्ष-किन्नर-पाताळ लोकांत उत्सुकता

**(पान १५८ वर)**

# दूरदर्शनवर महाभारत

(पान १० वरून)

असणार आणि त्यामुळे जाहिरातींचे भरपूर उत्पन्न मिळेल, हे गणित ह्या वाहिन्यांनी बिनचूक मांडले होते.

परंतु दुर्योधन महाराजांना शकुनी यांनी सल्ला दिला, ''बोलून चालून ही सगळी परकीय माध्यमे... युद्धप्रक्षेपणात त्यांनी उलट सुलट प्रचार केला, तर? त्यापेक्षा आपल्या हातातले 'दूरदर्शन' बरे नव्हे का?' युद्धस्य कथा रम्या असे म्हणतात, पण कुठली कथा रम्य हे आपण ठरवले पाहिजे...आणि ती कशी सांगायची हे पण.''

दुर्योधन महाराजांचा सूचना आणि प्रसारण मंत्रालयाला आदेश गेला, ''परकीय वाहिन्यांना युद्धाचे थेट प्रक्षेपण करायची परवानगी नाकारा आणि हे काम दूरदर्शनवर सोपवा.''

दूरध्वनीवरून हा आदेश दूरदर्शनकडे आला आणि ते खडबडून जागे झाले. शस्त्रास्त्रांच्या शर्यतींचे प्रसारण त्यांनी केले होते; पण त्यात




**ही निवेदकाच्या स्वातंत्र्यावर गदा आहे, अशी तीव्र प्रतिक्रिया देऊन आज मध्यरात्रीपर्यंत गंधर्व नगरीला परतण्याचा इरादा माझ्यापाशी त्यांनी व्यक्त केला...**

आणि घनघोर युद्धाच्या थेट प्रसारणात जमीन-अस्मानाचे अंतर होते. हे करू शकणारी अनुभवी व्यक्ती आणायची कुठून?

अशावेळी मदतीचा हात अनपेक्षित दिशेने आला. श्रीकृष्णांनी संजय यांचे नाव सूत्रसंचालक म्हणून सुचवले. संजय हे पूर्वी दूरदर्शनवर वृत्तविभागात काम करत. कुशल आणि चौकस, पण स्वतंत्रवृत्तीची ही व्यक्ती तिथल्या नोकरशाहीला कंटाळून बाहेर पडली आणि गंधर्वनगरीत स्वतंत्र दूरचित्रप्रसारकाचे काम करू लागली. परंतु देशाची इभ्रत राखायला श्रीकृष्णांच्या खास आग्रहावरून संजय दूरदर्शनकडे परत दाखल झाले. खुद्द धृतराष्ट्र महाराजांना युद्धाबद्दल उत्सुकता होती; पण अंधत्वामुळे त्यांना कुशल निवेदकाची गरज होती. त्यांना संजयच्या नियुक्तीमुळे विशेष आनंद झाला.

संजयच्या पुनरागमनामुळे दूरदर्शनमध्ये चैतन्य संचारले. युद्धाच्या थेट प्रक्षेपणाला आवश्यक यंत्रणा उभारायला संजय यांनी धूमधडाक्याने सुरुवात केली.

× × ×

पण प्रक्षेपणाच्या पहिल्या दिवशीच संजय यांना नोकरशाहीचा चटका बसला. युद्ध सकाळी सुरू झाले; पण दोन प्रहरानंतर प्रेक्षकांना दूरदर्शनवर संजयऐवजी त्याच्या सहकाऱ्याचे निवेदन ऐकू आले. मग संजय कुठे गडप झाले? वार्ताहरांनी दूरदर्शनकडे विचारणा केली; पण प्रथम खुलासा करायला कोणीच उपलब्ध नव्हते. अखेर एका प्रवक्त्याने दूरदर्शनतर्फे एका वाक्याचा खुलासा जाहीर केला : ''प्रकृती एकाएकी बिघडल्यामुळे संजयना युद्धक्षेत्रातून परतावे लागले व ते पुन्हा केव्हा कामावर रुजू होतील, हे आत्ता सांगता येत नाही.''

त्यानंतर घटिकाभरातच नारदवाहिनीवर संजय नाट्याचे सविस्तर वर्णन आले.

''कौरवांविरूद्ध भाष्य केल्यामुळे संजय यांना सुट्टीवर जाण्यास सांगण्यात आले. त्यामागची पार्श्वभूमी अशी : युद्ध सुरू होण्यापूर्वी युद्धक्षेत्रातच अर्जुन यांची चित्तवृत्ती डळमळू लागली. अहिंसेचे वारे त्यांच्या अंगात शिरले. आपण युद्धात जिंकलो तरी जो प्रचंड हिंसाचार होईल, दोन्ही बाजूंचे सगेसोयरे त्यांत दगावतील, ते पाहता न लढणे बरे असे ते म्हणू लागले. त्यांची समजूत घालता घालता त्यांचे सारथी श्रीकृष्ण यांनी त्यांना व्यवहारज्ञानापासून तत्त्वज्ञानापर्यंत जे उपदेशामृत पाजले, त्याचे यथोचित प्रसारण संजय यांनी केले. अखेर अर्जुन युद्धाला प्रवृत्त झाले. त्यावेळी संजय यांनी समारोप करताना केलेल्या भाष्याला धृतराष्ट्रमहाराजांसकट सर्व कौरवांनी आक्षेप घेतला.''

येथे नारदवाहिनीने संजयभाष्याची ध्वनिचित्रफीत दाखवली; जिच्यावर दूरदर्शनने आता बंदी आणली होती. चित्रफितीत संजय म्हणत होते : ''जिथे योगेश्वर कृष्ण आणि धनुर्धर पार्थ आहेत, तिथेच विजय येणार, हे माझे दृढ मत आहे.'' ही चित्रफीत दाखवल्यावर नारदवाहिनीने संजय यांच्या निवासस्थानी गेलेल्या वार्ताहराला पडद्यावर आणले. तो म्हणाला :

''मी संजय यांच्याशी नुकताच संपर्क साधला, तेव्हा त्यांनी स्पष्ट शद्वात आपली भूमिका व्यक्त केली. ते म्हणाले की, ज्याप्रमाणे कुठल्याही खेळाचे वर्णन करताना निवेदक आपले भाष्य करतो आणि पुढे काय होणार याचे आडाखे बांधतो, तसेच त्यांनी केले. त्यावर सरकारने व्यक्त केलेली प्रतिक्रिया म्हणजे निवेदकाच्या स्वातंत्र्यावर गदा आहे. आज मध्यरात्रीपर्यंत त्यांना परत बोलावले नाही, तर ते राजीनामा देऊन गंधर्वनगरीत परत जाणार आहेत.''

यानंतर सरकारची चक्रे कशी फिरली ते स्पष्ट झाले नाही; पण दुसऱ्या दिवशीच्या युद्धवार्ताप्रक्षेपणाला संजय जातीने हजर होते. त्यांनी झाल्या प्रकाराबद्दल मौन पाळले; पण आपले निवेदन पूर्वीप्रमाणे चालू ठेवले

× × ×

युद्धाच्या प्रारंभापासूनच कौरवदलात 'निष्ठावंत' आणि 'इतर' असा वाद वाढत गेला. कर्ण, दुःशासन, शकुनी आणि त्यांचे सहकारी स्वतःला खरे निष्ठावंत आणि दुर्योधन महाराजांचे हितचिंतक म्हणवत. याउलट भीष्म, द्रोण आणि कृप हे पांडवांना छुपी सहानुभूती दर्शवतात, असे निष्ठावंतांचे आरोप - कधी स्पष्ट तर कधी आडून - होत. कर्ण आणि भीष्म यांच्यात युद्ध सुरू होण्यापूर्वीच मोठी बाचाबाची झाली. वयाने, शौर्याने आणि कर्तृत्वाने ज्येष्ठतम भीष्मांना सेनापतीपद मिळाले, तेव्हा कर्ण यांनी भीष्म सेनापती असेस्तोवर युद्धात भाग न घेण्याचा निर्णय जाहीर केला.

'हस्तिनापूरकाल', 'इंद्रप्रस्थ जलदवार्ता', 'आर्यावर्त समाचार' इत्यादी वृत्तपत्रांत हा वाद पुष्कळ रंगला; पण दूरदर्शनच्या बातम्यांत त्याला स्थान मिळाले नाही. त्यामुळे जे लोक बातम्यांसाठी केवळ दूरदर्शनवर अवलंबून होते, त्यांना युद्धात पहिले दहा दिवस कर्ण यांचा उल्लेख का नाही, असा प्रश्न पडला.

खुद्द भीष्म शेवटपर्यंत हस्तिनापूरच्या सिंहासनाशी स्वामिनिष्ठ राहिले. पण आपण खरोखर निष्ठावंत आहोत हे दाखवण्याचा अकथित दबाव




''दर्शक हो ! हा महत्त्वाचा क्षण मनःचक्षूंत साठवून ठेवा बरं का ! कुरुक्षेत्र प्रश्नमंजुषा स्पर्धा क्रमांक नऊ या प्रसंगावर आधारलेली असणार आहे. हा प्रश्न कोणता ते सांगण्याआधी प्रथम स्पर्धा क्रमांक सहाचा निकाल...''

त्यांना सतत जाणवे. 'तुम्ही अर्जुनावर सरशी का करीत नाही', हे टुणटुणे दुर्योधन महाराजांकडून त्यांना सतत ऐकावे लागे. एकदा उत्तेजित होऊन त्यांनी अर्जुनावर असा मारा केला की, त्याच्या बचावासाठी श्रीकृष्ण यांना आपली युद्धात भाग न घेण्याची प्रतिज्ञा मोडून सुदर्शनचक्र घेऊन युद्धात उतरावे लागले.

अशातऱ्हेने पांडवांना नामोहरम करून सोडणाऱ्या भीष्मांना युद्धातून बाहेर पडावे लागले, ते वेगळ्याच कारणाने...कारण इंद्रप्रस्थ जलदवार्तेने शिखंडी प्रकरण उकरून काढले. एरव्ही आदरणीय भीष्मपितामहांच्या पूर्वजीवनातले ते एकमेव वादग्रस्त प्रकरण! पण त्यामुळे उद्‌भवलेल्या वाग्बाणांनी आहत होऊन भीष्म यांनी सेनापतीपदाचा राजीनामा दिला.

× × ×

''भीष्म यांचा राजीनामा स्वीकृत झाल्यावर कर्ण कौरवसेनेत दाखल झाले आहेत''. कर्ण मुळात लढत नव्हते हे कधी न सांगणाऱ्या दूरदर्शनने ते परत आल्याची बातमी उत्साहाने दिली. ''कर्ण यांनी सेनापतीपदासाठी द्रोणाचार्य यांचे नाव सुचवले आणि ते सर्वानुमते संमत झाले.''

पण ह्यामागचे रामायण वृत्तपत्रांनी प्रसिद्ध केले. 'हस्तिनापूरकाल' मधील बातमी पहा :

''कर्ण कौरवसेनेत परत आले, ते ह्या अपेक्षेने की भीष्मांनंतर त्यांनाच सेनापतीपद मिळेल. खुद्द दुर्योधन महाराजांचा त्यांना पाठिंबा होता. ज्येष्ठतेचा संकेत पाळला, तर द्रोणाचार्यांचे नाव निर्विवादपणे पुढे येणार. पण ते निष्ठावंत आहेत का, याबद्दल शंका असल्याने दुर्योधन महाराज अडचणीत होते. त्यांच्या शंकेला खतपाणी घालायचे काम दुःशासन आणि शकुनी करत होते. परंतु ज्येष्ठतेचा निकष डावलून सेनापती नेमल्यास सेनेचे मनोधैर्य खच्ची होईल, हे कृपाचार्य, शल्य आदींनी ठासून सांगितल्यामुळे अखेर महाराजांनी द्रोणाचार्यांची नेमणूक केली. जरूर पडल्यास त्यानंतरचे सेनापतीपद कर्ण यांनाच दिले जाईल आणि त्यावेळी शल्य स्वतः त्यांचे सारथ्य करतील, असे आश्वासन कर्ण यांना देण्यात आल्याचे कळते. मात्र वार्ताहर परिषदेत दुर्योधन-कर्ण-शल्य तिघांनी ह्या आश्वासनाचा जाहीर इन्कार केला.''

× × ×

युद्धाचा तेरावा दिवस. अभिमन्यूवधामुळे क्षुब्ध झालेल्या अर्जुनांनी जयद्रथांच्या वधाची प्रतिज्ञा केली होती. सूर्यास्तापूर्वी त्यांच्या हातून जयद्रथाला मृत्यू आला नाही, तर ते स्वतः आत्मदहन करणार होते.

द्रोणाचार्यांच्या नेतृत्वाखाली कौरवांनी जयद्रथ यांना कडेकोट बंदोबस्तात ठेवले होते. त्यांचा शोध घेत अर्जुन आणि त्यांचे सहकारी कसे पुढे सरकताहेत, याचे संजय रसभरीत वर्णन करीत होते. जसजसा सूर्यास्त जवळ येत चालला, पडद्यावर आकडेवारी उमटू लागली. एका बाजूला सूर्यास्ताला किती पळे उरली; तर दुसऱ्या बाजूला अर्जुन-जयद्रथ अंतर किती उरले, सकाळपासून अर्जुन किती कौरवसैनिक मारत आले याचे-पुढे सरकणारे रेखाचित्र - इत्यादी माहिती मधूनमधून येत होती.

संजय उत्साहाने निवेदन करीत होते...''सकाळी कौरवसैनिक मारण्याचा अर्जुन यांचा वेग घटिकेमागे एक सहस्त्र, म्हणजे संथ म्हटला पाहिजे. पण श्रीकृष्णांनी आखून दिलेल्या योजनेप्रमाणे त्यांचे मार्गक्रमण चालले होते. वाटेत कौरवांनी त्रिगर्तांना खास उद्देशाने पाठवले. त्रिगर्तांनी बचावात्मक युद्ध करून अर्जुन यांना एकाच जागी खिळवून ठेवावे, हा तो उद्देश. पण तो ओळखून श्रीकृष्णांनी त्रिगर्तांच्या सेनेला बगल मारून रथ पलीकडे नेला. दुसऱ्या प्रहरी अर्जुन यांचा कौरववीर मारण्याचा वेग घटिकेमागे तीन हजार इथपर्यंत चढला... आमचे संगणक सांगतात की, उरलेल्या वेळात हा वेग सरासरी चार हजारपर्यंत गेला पाहिजे. अर्जुन यांचे पूर्वीचे पराक्रम पाहता हे अशक्य नाही...


''आता शेवटच्या अर्ध घटिकेत अडीच हजार कौरवसैनिकांची भिंत भेदूनच अर्जुन यांना जयद्रथांपर्यंत जाता येईल. हे घडले, तर अर्जुन यांचा स्वतःचा उच्चांक मोडेल, फार काय राम-रावण युद्धातला इंद्रजीत यांचा उच्चांकपण मोडेल. हे आव्हान अर्जुन यांना पेलेल का? मला स्वतःला शंका वाटते. पण सारथी श्रीकृष्ण काही तरी शक्कल शोधून काढतीलच...''

× × ×

कान्यकुब्ज ते उत्कल, सिंधुपासून ब्रह्मपुत्रेपर्यंत तसेच नगाधिराज हिमालयापासून श्रीलंकेपर्यंत भरतखंडातील जनता दूरदर्शनच्या पहिल्या वाहिनीवर खिळून बसली होती. काही गावांत राजपथावर मोठ्या पडद्यावर दूरचित्रीकरण पहायला गर्दी जमली होती. कौरव, पांडव दोघांच्या समर्थकांनी आपापले फटाके,



...अन् आता स्पर्धा क्रमांक सहाच्या अचूक उत्तरदात्या विजेत्यांची निवड.




**''युद्धानं या क्षणी एक अनपेक्षित न् चित्तथरारक वळण घेतलं आहे !... पण पुढं काय होतं हे पाहण्याआधी एक छोटं मध्यंतर...''**

आतषबाजी इ. विजयोत्सवासाठी आणले होते. अर्जुन की जयद्रथ...दिवसअखेर कोण राहणार, कोण जाणार ही उत्सुकता शिगेला गेली होती. वंग, मलय आदि देशांत सूर्यास्त झाला होता, पण कुरुक्षेत्रात सूर्य अजूनही क्षितिजावर आहे, हे दूरदर्शन प्रक्षेपणात दिसत होते...

पण हा हन्त हन्त...!

पडद्यावरून युद्धाची चित्रे अदृश्य झाली. संजय यांचा उत्तेजित आवाज विलीन झाला. पडद्यावर सूचना झळकली.

''युद्धाचे उर्वरित प्रक्षेपण आता दुसऱ्या - राजधानी वाहिनीवर - दिसेल. ह्या वाहिनीवर आता सूर्यास्तकालीन बातमीपत्र पहा.''

लाखो प्रेक्षकांनी अपेक्षाभंगाचे धिःकार-फूत्कार-चीत्कार सोडले, मुठी आवळल्या, थयथयाट केला. पण उपयोग काय? ज्या काही महाभागांकडे दुसरी वाहिनी यायची सोय होती, त्यांच्याकडे शेजारीपाजारी जमले. अजूनही प्रसंगाचे नाट्यमय माहात्म्य ओळखून दूरदर्शन पहिल्या वाहिनीवर प्रक्षेपण चालू करेल ह्या अपेक्षेने जे थांबले, त्यांच्या नशिबी काय आले?

...आजच्या प्रमुख बातम्या...

सांदीपनी ऋषींची राजधानीस सदिच्छा भेट...

महिषी गांधारी कन्याशाळेचा वार्षिक समारंभ राजकुमारी दुःशलाताईंच्या हस्ते संपन्न...

अत्यावश्यक सेवा कायद्यानुसार रथदुरुस्तीकारांचा संप अवैध घोषित...

कुरुक्षेत्रात घमासान युद्ध चालू...

आणि बातम्या संपेपर्यंत सूर्यास्त होऊन गेला, कुरुक्षेत्रातही. निदान अर्जुनप्रतिज्ञेचा निकाल काय झाला ते कळावे, म्हणून ज्यांनी बातम्यांचा कार्यक्रम पूर्ण ऐकण्याची सहनशीलता दाखवली, त्यांना काय ऐकायला मिळाले?

''...आत्ता हाती आलेल्या बातमीनुसार सूर्यास्त होईपर्यंत जयद्रथ न सापडल्याने अर्जुन आता आत्मदहनाची तयारी करीत आहेत...''

× × ×

''बिचारा पार्थ! काल आपला मुलगा गमावला आणि आज स्वतःचे प्राणही. आता त्या कौरवांना कोण धडा शिकवणार? अंगराज कर्णाला आवरणारा कोण आहे युधिष्ठिराकडे?'' दूरचित्रवाणी संच बंद करत रामव्यासशास्त्री म्हणाले. त्यांचा पांडवांना पाठिंबा होता. एकंदर काशीक्षेत्रात जनता युधिष्ठिर महाराजांची समर्थक होती.

इतक्यात शेजारचे लक्ष्मण शर्मा उत्साहाने धावत आले. ''बातमी ऐकली का?''

''कसली? पार्थाच्या आत्मदहनाची? दूरदर्शनने नुकतेच सांगितले की तो आत्मदहनाच्या तयारीत होता, म्हणून.''

''छे हो! ती बातमी केव्हाच इतिहासजमा झाली. खरी बातमी अभ्यवेक्षकाने पारित केल्यावर दूरदर्शन सांगेल...मी ती बातमी आत्ता नारदवाहिनीवर ऐकली.'' लक्ष्मण शर्मा म्हणाले.

''काय घडले ते सरळ स्पष्ट सांगा लक्ष्मणशास्त्री!'' अधीरतेने रामव्यासशास्त्री म्हणाले.

''संपूर्ण नाट्य सांगतो. दूरदर्शनने सांगितला, तो सूर्यास्त नव्हता. सूर्य तात्पुरता झाकला गेला. अंधार पडला, तेव्हा अर्जुनासकट सर्वांना वाटले दिवस संपला. आपण अयशस्वी झालो म्हणून अर्जुन चितेची तयारी करू लागला आणि ती मजा पहायला स्वतः जयद्रथ प्रकट झाला... इतक्यात सूर्याचे ग्रहण का काय होते, ते सुटले. अजून तो क्षितिजावर होता; पण अस्तास जायला फार वेळ नव्हता. श्रीकृष्णाने ओरडून सांगितले 'कौन्तेया! हा पहा सूर्य आणि हा पहा जयद्रथ!' पार्थाने तत्काळ बाण मारून जयद्रथाचा शिरच्छेद केला.''

एक घटिकेनंतर दूरदर्शनने खास घोषणा जाहीर केली, ''सूर्य झाकण्याचा कट कोणी केला हे शोधून काढायला संतप्त दुर्योधन महाराजांनी एक चौकशी आयोग नेमला आहे आणि तो दोन दिवसांत आपला अहवाल सादर करेल.''

× × ×

प्रत्येक सैनिकाचे आणि युद्धात लढणाऱ्या हत्ती, घोड्याचे परिचयपत्र छायाचित्रासह असावे ह्या शेषनागांच्या फतव्याचे महत्त्व कौरवांना पंधराव्या दिवशी जाणवले...

त्या दिवशी एक अफवा उठली आणि वाऱ्यासारखी पसरली.... पांडवांनी अश्वत्थाम्याचा वध केला.

ती अफवा कौरवसेनापती द्रोणाचार्यांच्या कानावर आली. अश्वत्थामा म्हणजे त्यांचा लाडका पुत्र तर नव्हे?

खात्री करून घ्यायला ते सत्यवचनी युधिष्ठिर महाराजांकडे गेले. युधिष्ठिर यांना नक्की माहीत नव्हते. ते उत्तरले ''अश्वत्थामा मेला हे खरे, पण सचित्र परिचयपत्र माझ्याकडे आले नसल्याने मी तो नर का कुंजर हे सांगू शकत नाही.'' वाक्याच्या पहिल्या भागातले चार शब्द बोलून झाल्यावर गोंगाट वाढल्याने त्यांना पुढचा भाग ऐकू आला नाही. आपला पुत्र गेला ह्या बातमीच्या धक्क्याने ते विचलित झाले आणि शस्त्रास्त्रे टाकून रणांगणात ध्यानस्थ बसले. त्या स्थितीत दृष्टद्युम्न




''युद्धाच्या या भागाचे प्रायोजक होते...''

यांनी त्यांचा शिरच्छेद केला.

ह्यावर संजय यांनी केलेल्या भाष्याला दूरदर्शनने पुष्कळ प्रसिद्धी दिली. संजय म्हणाले, ''हा द्रोणाचार्यांना मारायचा कट होता. अश्वत्थामा नावाचा हत्ती मारला गेला, हे युधिष्ठिर यांना माहीत होते. द्रोणपुत्र अश्वत्थामा आणि हत्ती यांत घोटाळा होण्याची शक्यता नाही. पण मृताचे परिचयपत्र द्रोण यांना दाखवता आले असते, तर हा दुर्दैवी प्रसंग आला नसता.''

ह्या प्रसंगाने शेषनाग यांची सहनशक्ती मात्र संपुष्टात आली. धर्मयुद्धाचे नियम धाब्यावर बसवून कौरवपांडवांनी युद्धआयुक्तपदाचा अवमान केला, म्हणून पदाचा राजीनामा देऊन ते क्षीरसागराकडे परत गेले. श्री विष्णूंनी त्यांची केलेली प्रतिनियुक्ती संपुष्टात आली.

× × ×

नारद वाहिनीने एक सनसनाटी वृत्त सांगितले. ''श्री कर्ण यांची द्रोणाचार्यपश्चात् कौरव सेनापती म्हणून नियुक्ती झाली. पण त्यांना फितवून पांडवांना सामील करण्याचा एक प्रयत्न झाल्याचे वृत्त आमच्या हाती आले आहे.

''श्री कर्ण यांना भेटायला खुद्द पांडवमाता कुंतीदेवी आल्या होत्या. त्यांच्यात गुप्त चर्चा झाली, त्यावेळी हा प्रयत्न झाला. पण तो अयशस्वी ठरला. कुंतीदेवींनी श्री कर्ण यांना कोणते प्रलोभन दाखवले असेल, याचा तर्क आमच्या राजकीय सल्लागारांना करता आला नाही.''

ही वार्ता ऐकून पांडवही चकित झाले; पण त्यांच्या प्रश्नांना उत्तर देण्यास कुंतीदेवींनी नकार दिला. त्यांची कर्ण यांच्याशी झालेली चर्चा खासगी स्वरूपाची होती, एवढेच त्यांनी सांगितले. श्री कर्ण यांनी नारदवाहिनीच्या वृत्तावर भाष्य करण्यास इन्कार केला आणि आपली दुर्योधन महाराजांप्रती अढळ निष्ठा जाहीर केली.

× × ×

पांडवांचे सात आणि कौरवांचे अकरा अक्षौहिणी सैन्याचा नाश करणारे महाभारतीय युद्ध अठरा दिवसांत संपले. धृतराष्ट्र महाराजांच्या शंभर पुत्रांपैकी नव्याण्णव हत झाले; पण खुद्द दुर्योधन महाराज कुठे अदृश्य झाले, ते कोणालाच माहीत नव्हते. त्यांचा शोध चालू होता. अशावेळी दूरदर्शनच्या वार्ताहराने स्वतःच्या हुशारीने बातमी मिळवली आणि वृत्तसंपादकाला दिली. अर्ध्या घटिकेत मध्यान्हीचे बातमीपत्र होते. ही अतिमहत्त्वाची बातमी वृत्तसंपादकाने त्यासाठी तयार केली. (दूरदर्शन बातम्या मिळवण्यात इतर कुठल्याही वाहिनीच्या मागे नाही, हे सिद्ध होत होते)

''आत्ताच हाती आलेल्या बातमीनुसार दुर्योधन महाराज एका तलावात लपलेले पांडवांना सापडले. युधिष्ठिर यांनी कुठलेही शस्त्र वापरून कुठल्याही पांडवाशी द्वंद्वयुद्ध करायचे त्यांना आवाहन केले. त्यांनी भीम यांच्याशी गदायुद्ध करायचे ठरवले आणि त्यांतच त्यांचा अंत झाला. आणि हे भीषण महायुद्ध संपल्याचे युधिष्ठिर महाराजांनी जाहीर केले.''

पण वरिष्ठांनी ही बातमी प्रसारित करू दिली नाही. वृत्तविभागाला सांगण्यात आले की, श्री विदूर कुरुक्षेत्राकडून हस्तिनापुराकडे निघाले आहेत -- ते धृतराष्ट्र महाराजांना ही बातमी सांगतील आणि त्यांच्या आदेशानुसार ही बातमी योग्य त्या शब्दांत जाहीर करावी.... कारण बातमी फार नाजुक आहे, तिचे आमजनतेवर काय परिणाम होतील सांगता येत नाही.

तेव्हा नाइलाजाने मध्यान्ह, सायंकाळच्या बातम्यांत दूरदर्शनने एवढेच सांगितले :

''दुर्योधन महाराजांचा शोध चालू असून अद्याप त्यांचा पत्ता लागला नाही.'' रात्रीच्या बातमीपत्रातच खरी बातमी सांगायची परवानगी दूरदर्शनला मिळाली. दरम्यान नारदवाहिनी सकट इतर वाहिन्यांवर आणि सायंकालीन वृत्तपत्रांत खरी बातमी केव्हाच प्रसिद्ध झाली होती.

× × ×

हस्तिनापुरात सत्तान्तर झाले. नव्या जोमाने युधिष्ठिर महाराजांनी तडकाफडकी काही निर्णय घेतले. त्यांत एक होता दूरदर्शनला स्वायत्तता देण्याचा. 'सरकारधार्जिणा', 'एकतर्फी प्रचार करणारा', 'नोकरशाहीने ग्रस्त' इत्यादी आरोपांतून हे माध्यम मुक्त करावे असा त्यांचा इरादा होता. पण हा त्यांचा उद्देश श्रीकृष्णांच्या कानावर जाताच ते द्वारकेहून तत्काळ हस्तिनापुरात आले. 'माझ्याशी चर्चा करण्यापूर्वी हा निर्णय अमलात आणू नका', अशी विनंती त्यांनी महाराजांना दूरपत्राने (फॅक्स) केली.

आल्या आल्या ते सरळ महाराजांच्या खासगी मंत्रणा कक्षात दाखल झाले आणि सुरुवातच आक्रमक भाषेत केली.

''पण हे माझे युद्धापूर्वीचे आश्वासन होते. ते पाळायला पाहिजे,'' युधिष्ठिर महाराज शांत स्वरात म्हणाले. ''आणि टीका सहन करायची तयारी राज्यकर्त्यात पाहिजे, असे मी नेहमी म्हणत आलोय. मला तरी ह्यात कसलाही धोका दिसत नाही.''

''अगदी हेच शेवटचे वाक्य तू द्यूताचे आमंत्रण स्वीकारताना म्हटले होतेस, आठवतंय? राजा! दूरदर्शन एक प्रभावी माध्यम आहे. जनमताला योग्य दिशा दाखवणे, जनतेला सत्यच पण निवडलेले सांगणे, स्वतःची आणि आपल्या आप्तस्वकीयांची प्रतिमा सतत लोकांपुढे ठेवणे, अशांसाठी दूरचित्रवाणीसारखे दुसरे माध्यम नाही. राजाला आपले सिंहासन टिकवायला, बळकट करायला हे अत्यावश्यक आहे. जर तू दूरदर्शनला स्वायत्तता दिलीस, तर त्या वाहिनीची दुधारी तलवार बनेल आणि तुलाही तिचे वार बसतील.....''

थोडक्यात, कुरुक्षेत्रावर अर्जुनाला सांगितली तशीच दुसरी एक गीता श्रीकृष्णांनी युधिष्ठिर महाराजांना ऐकवली. आणि 'नष्टोमोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादात् मयाऽच्युत' असे युधिष्ठिरांनी म्हणेपर्यंत श्रीकृष्णांनी त्यांचा पिच्छा सोडला नाही. फक्त युधिष्ठिर अर्जुनापेक्षा जास्त हट्टी आहेत (- त्यालाच सत्याग्रही म्हणतात) हे जाणून श्रीकृष्णांनी त्यांना पटेल असा पर्याय सुचवला. अश्वत्थामा, नारद आणि मारुती यांची एक समिती नेमून स्वायत्तता कशी असावी, कशी वापरावी इत्यादीचा अहवाल आल्यावर मग कार्यवाही करावी, असे श्रीकृष्णांनी सुचवले आणि युधिष्ठिर महाराजांनी मान्य केले.

चाणाक्षपणे श्रीकृष्णांनी अमर व्यक्तींचीच ह्या समितीसाठी शिफारस केली होती.

....... कारण समितीचा अहवाल अजून सादर व्हायचा आहे.



''अश्वत्थामा-नारद-मारुती समितीचं काम वेगानं चालू असून, या वर्षाअखेरीपर्यंत ती आपला अहवाल पूर्ण करू शकेल असा अंदाज...''

■